**ठळक बातम्या**

- बलिप्रतिपदेचा सर्वत्र उत्साह

- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग / प्रधानमंत्री नरेंद्र मोदी घेणार ८ प्रचारसभा

- राज्यात सत्ताबदल गरजेचा असल्याचं शरद पवार यांचं प्रतिपादन

- निवडणूक आयोगाचा कडक बंदोबस्त अहिल्यानगर आणि कोल्हापूरमधे मोठा मुद्देमाल जप्त

**आणि**

- न्यूझीलंडविरोधातल्या तीसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्या डावात भारताची न्यूझीलंडवर २८ धावांची आघाडी

**<><><><><>**

आज कार्तिक शुद्ध प्रतिपदा, म्हणजेच बलिप्रतिपदा किंवा दिवाळी पाडवा. हा दिवस साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक मानला जातो. त्यामुळे चांगल्या उपक्रमांची सुरुवात किंवा महत्त्वाची खरेदी आज केली जाते. घर, वाहन किंवा सोने खरेदीसाठी आजचा मुहूर्त साधण्याचा साधारण कल आहे. भेटवस्तू, तसंच मोबाईल फोन्स, आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदीही मोठ्या प्रमाणात होत आहे. मोठी दुकानं, मॉल्स, घाऊक बाजारपेठा, सराफकट्टे गजबजले आहेत. अनेकांनी ऑनलाईन खरेदीला पसंती दिली आहे. देशाच्या

अनेक भागात हा नववर्षाचा प्रारंभ मानला जातो. गुजराती नववर्षानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर गुजराती भाषेत शुभेच्छा संदेश दिला आहे. हे नवीन वर्ष सर्वांसाठी आनंद, सफलता, आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो, अशी कामना त्यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं विविध राजकीय पक्ष या सणाचं औचित्य साधून अधिकाधिक मतदारांपर्यंत पोचण्याचा प्रयत्न करत आहेत.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीतील उमेदवारांना अर्ज माघारी घेण्याची मुदत ४ नोव्हेंबरला संपणार असून त्यानंतर दोनच दिवसांनी विविध पक्षांच्या प्रचाराच्या तोफा धडाडणार आहेत. महाविकास आघाडीच्या प्रचाराला बुधवारी ६ नोव्हेंबर रोजी सुरुवात होणार आहे. मुंबईतील बीकेसी मैदानावर बुधवारी महाविकास आघाडीची सभा होणार आहे. या सभेला लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष शरद पवार आणि उद्धव ठाकरे उपस्थित राहणार आहेत. तर दुसरीकडे महायुतीच्या प्रचाराचा प्रारंभ ८ तारखेला होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ८ नोव्हेंबरला महाराष्ट्रात येणार आहेत. महायुतीकडून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ८ सभा या विधानसभा निवडणुकीत घेणार आहेत.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीत प्रचाराच्या तोफा धडाडण्यास अद्याप प्रारंभ झाला नसला तरी आरोपांच्या फुलबाज्या उडण्यास सुरुवात झाली आहे.

महत्त्वाचे राजकीय प्रश्न हाताळण्यात सत्ताधारी महायुतीला अपयश आल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी केला आहे. बारामतीमध्ये पत्रकार परिषदेत त्यांनी हा आरोप केला. महाविकास आघाडीकडे विकासाची दिशा आहे आहे. त्यामुळेच आम्ही राज्यात परिवर्तन घडवून आणू शकतो, असा विश्वासही पवारांनी यावेळी व्यक्त केला. सिंचन घोटाळ्याचा आम्ही उल्लेखही केला नसल्याचे त्यांनी स्पष्ट करीत आर. आर. पाटील अतिशय निर्मळ मनाचे राजकीय व्यक्तीमत्व होते, असेही ते म्हणाले.

दुसरीकडे भारतीय जनता पक्षाने राट्रवादी काँग्रेसचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सिंचनाच्या प्रश्नावरून १० वर्षे ब्लॅकमेल केल्याचा आरोप काँग्रेसनं केला आहे. तर महाराष्ट्रात नवे उद्योग कोणते आले आहेत ते दाखवा असा सवाल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी महायुती सरकारला केला आहे.

याला प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सत्तेसाठी उद्धव ठाकरे काँग्रेससोबत गेल्याचे म्हटलं आहे. आपण शिवसेना वाचवण्यासाठी भाजपसोबत आल्याचे त्यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले.

**मुंबईच्या** माहीम मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांनी पाठिंबा देण्याची भूमिका घेतली आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मात्र माहीमची उमेदवारी जाहीर करताना मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी विश्वासात घेतलं नसल्याचं म्हटलं आहे. माहीममध्ये विद्यमान आमदार सदा सरवणकर यांनीही आपण माघार घेणार नसल्याचे स्पष्ट केले. **वरळीतील** भाजपच्या

उमेदवार शायन एन सी यांच्यावर केलेल्या आरोपांनंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अरविंद सावंत यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तर आपल्या विधानाचा विपर्यास करण्यात आल्याचा दावा अरविंद सावंत यांनी केला.

**<><><><>**

भाजपाचे बंडखोर आमदार गोपाळ शेट्टी यांनी बोरिवली विधानसभा मतदारसंघातून माघार घेणार नसल्याचं स्पष्ट केलं. त्यांनी आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या ‘सागर’ शासकीय निवासस्थानी त्यांची भेट घेतली. दिवाळीच्या शुभेच्छा देण्यासाठी ही भेट असल्याचं त्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. आपण पक्ष सोडलेला नाही, पक्षानं आपल्याला बाहेर काढलं तरी पक्ष सोडणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. आपलं प्रत्येक पाऊल पक्षाच्या हितासाठी, पक्षात राहून पक्षाची हानी करणाऱ्यांविरोधात आहे, असं सांगून निवडणूक लढवण्यावर आपण ठाम असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज हिंगोली आणि परभणी जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

राज्याची सध्याची स्थिती गंभीर असून ती बदलण्यासाठी सत्ताबदलाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे राज्याला पूर्वपदावर आणण्याची ताकद असणाऱ्यांना जनतेनं आपला कौल द्यावा आणि ती ताकद फक्त महाविकास आघाडीत आहे, असं

प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केलं आहे. गोविंद बाग इथं ते पत्रकारांशी बोलत होते. राज्यात परिवर्तन आणण्याचा आणि राज्याच्या नागरिकांच्या जीवनात सुधारणा करण्याचा निर्धार आज पाडव्याच्या दिवशी करायचा आहे, असं त्यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचा, राज्याच्या आर्थिक स्थितीबाबतचा निष्कर्ष गंभीर आहे. सत्ताधाऱ्यांनी वेळीच याकडे लक्ष न दिल्याचा हा परिणाम आहे, असा आरोप त्यांनी केला. राज्यात जनहितासाठी राबवण्यात येत असलेल्या योजनांसाठीचा निधी सरकारनं गेल्या दोन-अडीच महिन्यांमध्ये दुसरीकडे वळवल्यानं लाभार्थ्यांच्या हातात काहीच पडलेलं नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवार आणि निवडणूक यंत्रणा कार्यरत झाले आहेत. अहमदनगर जिल्ह्यात सुपा टोलनाक्यावर एका गाडीतून २३ कोटी ७१ लाख रुपये किमतीची सोन्याची बिस्किटं आणि चांदी जप्त केली. निवडणूक आयोगाचं पथक आणि पोलिसांनी या गाडीच्या संशयित हालचाली टिपून हटकलं आणि झडती घेतली तेव्हा हा मुद्देमाल मिळाला. ही गाडी छत्रपती संभाजीनगर कडून पुण्याकडे निघाली असल्याचं चालकानं सांगितलं. याप्रकरणी पुढचा तपास सुरु आहे.

**<><><><><>**

कोल्हापूर, जिल्ह्यात शिये-बावडा तपासणी नाक्यावर स्थिर सर्वेक्षण पथकाने २ हजार ५३३ वाहनांची तपासणी केली. एका वाहनातून १५ लाख ६१ हजार ८५७ रुपये इतकी रक्कम आढळून आली. या रकमेबाबत संबंधितांकडे कोणतेही पुरावे आढळून न आल्याने ही रक्कम जप्त करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यातल्या १२ विधानसभा मतदारसंघांमध्ये गैरप्रकार थांबवण्यासाठी स्थिर आणि भरारी पथकांची संख्या वाढवून प्रत्येकी तीन करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीच्या वेळी या १२ मतदारसंघांमध्ये रोख रक्कम, मद्य आणि मौल्यवान वस्तूंच्या जप्तीचं प्रमाण सर्वाधिक होतं. हे लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे. निवडणुकीच्या शेवटच्या तीन दिवसांमध्ये या पथकात केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या अधिकाऱ्यांचाही समावेश असणार आहे.

**<><><><><>**

तळकोकणातल्या उभादांडा गावात दिवाळीत गणेशोत्सव साजरा होतो. या अनोख्या प्रथेबद्दलची माहिती आमच्या सिंधुदुर्ग वार्ताहराकडून....

**होल्ड व्हाईस कास्ट**

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात कसोटी क्रिकेट मालिकेतल्या मुंबईच्या वानखेडे मैदानावर सुरु असलेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या सामन्यात, भारतानं पहिल्या डावात न्यूझीलंडवर २८ धावांची नाममात्र आघाडी घेतली आहे. आज सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतानं आपला पहिला डाव, ४ बाद ८६ धावांवरून पुढे सुरू केला. काल नाबाद असलेल्या शुभमन गील आणि ऋषभ पंत यांनी पाचव्या गड्यासाठी ९६ धावांची भागिदारी करत भारताचा डाव सावरला. गील यानं ९० तर पंत यानं ६० धावांची खेळी केली. पंत बाद झाल्यानंतर भारताचे उर्वरीत फलंदाज ठराविक अंतरानं बाद होत गेले आणि भारताचा पहिला डाव २६३ धावांत आटोपला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझीलंडच्या दुसऱ्या डावात ३ बाद ५८ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

फॅशनविश्वातलं प्रसिद्ध व्यक्तिमत्व रोहित बल याचं काल रात्री हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. ते ६३ वर्षांचे होते.

**//<><><><><>//**